परशुराम घाटाचे रस्ता रुंदीकरण तात्काळ सुरू करा! आ. भास्कर जाधवांच्या सूचना

रत्नागिरी, प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटातील रस्ता रूंदीकरणाचे काम थांबल्यास धोका अधिक वाढू शकतो. त्यामुळे परशुराम ग्रामस्थांशी संभाव्य धोक्यांबद्दल चर्चा करून महामार्ग रुंदीकरणाचे काम सुरू करण्याच्या सूचना आमदार भास्कर जाधव यांनी महामार्ग विभागाच्या अधिकार्यांना केल्या आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर परशुराम घाटामध्ये रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असताना दरड कोसळली आणि दोन पोकलेन मातीखाली गेले. या दुर्घटनेत एका पोकलेन चालकाचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर गुहागर-चिपळूण-खेड मतदारसंघाचे आमदार भास्करराव जाधव यांनी घाटामध्ये प्रत्यक्ष पाहणी केली. दुर्घटनेमुळे काम थांबवून ठेवल्यास धोका अधिक वाढू शकतो. घाटाच्या वरच्या भागातील परशुराम ग्रामस्थांशी चर्चा करण्याची सूचना जाधव यांनी केली. चर्चेत काही संभाव्य धोका लक्षात आल्यास त्याची ग्रामस्थांना कल्पना देऊन हे काम तात्काळ सुरू करा, अशा सूचना त्यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार कंपनीच्या अधिकार्यांना केल्या. ज्या ठिकाणी दरड खाली आली आहे तिथे वरच्या बाजूला परशुराम गावात जाणारा रस्ता आणि वस्ती आहे. दरड कोसळल्यामुळे या वस्तीला धोका निर्माण झाला आहे का, याची पाहणी प्रत्यक्ष करावी, अशी सूचना आमदार जाधव यांनी अधिकार्यांना केली आहे. दुर्घटनेनंतर हे काम थांबविण्यात आले आहे. परंतु, कोणत्याही परिस्थितीत काम थांबवू नका. ते आहे तसे राहिले तर पावसाळयात खूप मोठा धोका निर्माण होऊन गंभीर परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे परशुरामच्या ग्रामस्थांना विश्वासात घ्या त्यांच्याशी चर्चा करा आणि काम तात्काळ सुरू करा, असे भास्कर जाधव म्हणाले.

ग्रामस्थांना विश्वासात घ्या!

महाराष्ट्रात तूर्तास मास्क मुक्ती नाही! आरोग्यमंत्र्यांची माहिती

कोल्हापूर- कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला असला तरी अजून कोरोनश गेलेला नाही त्यामुळे निर्बंध शिथिल केले जातील पण तूर्तास तरी मास्क मुक्ती करून कोणतेही संकट ओढून घ्याचे नाही असे राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले आहे. आज कोल्हापूर मध्ये पत्रकारांशी बोलताना राजेश टोपे यांना मास्कबाबत प्रश्न विचारण्यात आला त्यावर ते म्हणाले की, ब्रिटन आणि काही पश्चात देशांनी मास्क मुक्ती केली आहे, पण त्यांनी तसा निर्णय का घेतला याचा अभ्यास करावा लागेल. आपण याबाबतची सर्व माहिती संकलित करीत आहोत असे टोपे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले इतक्या मोठ्या लोकशाही देशात तत्काळ मास्क मुक्ती करून कोणतेही संकट ओढवून घ्यायचे नाही. कोरोनाची लाट ओसरत चालली आहे. रुग्णसंख्या कमी होत आहे . जानेवारी महिन्यात रुग्णसंख्या वाढली होती पण आता फेब्रुवारीत ती कमी झालीय. त्यामुळे निर्बंध शिथिल केले जातील नाट्यगृह, सिनेमागृह, बार, रेस्टोरंट फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबतच विचार सुरु आहे. राज्य सरकारने जानेवारीपूर्वी लावलेले निर्बंध हटवले आहेत आता फेब्रुवारीच्या अखेरीस महाराष्ट्र पूर्णपणे अनलॉक केला जाईल.

आंतरराष्ट्रीय प्रवाशांना १४ फेब्रुवारीपासून ७ दिवस होम क्वारंटाईनची गरज नाही

नवी दिल्ली

देशात हळूहळू कोरोना रुग्णांची संख्या कमी होत आहे. रुग्णांची संख्या कमी झाल्यामुळे निर्बंध देखील शिथील केले जात आहेत. अशातच आता केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून, १४ फेब्रुवारीपासून ७ दिवस होम क्वारंटाईन होण्याची आवश्यकता नसणार आहे. जगभरातील कोरोनाची प्रकरणे लक्षात घेऊन प्रवासाबाबत नियम बनवण्यात आले असल्याचे आरोग्य मंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे.

आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, प्रवास करण्यापूर्वी प्रवाशांनी ७२ तास आधी कोरोना चाचणी निगेटीव्ह आल्याचे प्रमाणपत्र अपलोड करणे गरजेचे आहे. तसेच लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देखील गरजेचे असणार आहे. तसेच आता ७ दिवस होम क्वारंटाईन होण्याची आवश्यकता नसणार आहे. येत्या १४ फेब्रुवारीपासून नवी नियमावली जारी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, प्रवास करण्यापूर्वी प्रवाशांनी लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देखील गरजेचे असणार आहे. तसेच आता ७ दिवस होम क्वारंटाईन होण्याची आवश्यकता नसणार आहे. प्रवाशांना भारताचा दौरा करण्यापूर्वी त्यांचा मागील १४ दिवसांचा प्रवास व भारतातील पूर्ण प्रवासाबद्दल महिती देणे गरजेचे आहे.

शुद्धीपत्रक

सदर वृत्तपत्रामध्ये दि. १०.०२.२०२२ रोजी पृष्ठ क्र. ५ वर **जाहीर सूचना** या शीर्षकाअंतर्गत प्रसिद्ध झालेल्या वकील **दिपेश जे. सांचला** यांच्या जाहिरातीमधील **मालमत्तेची अनुसूची** मध्ये सदनिका क्र. ३०३ चे मोजमाप नजरचुकीने ६८१.० चौ.फू. असे प्रसिद्ध झाले आहे. त्याऐवजी कृपया **मोजमाप ६८१.५० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ** असे वाचावे. त्याव्यतिरिक्त जाहिरातीमध्ये कोणताही बदल नाही.

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकार चा उपक्रम)

सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील जिल्हा रायगडच्या **इंदापूर येथे कोलाड आणि माणगांव स्थानकांदरम्यान नवीन क्रॉसिंग स्टेशनच्या तरतूदीच्या संदर्भात रेल्वे किमी २४/१४२ येथील मुठवाली रोड वरील लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. १० हे आवश्यक रस्ता वळवून किमी २४/३८७ येथे स्थलांतरित करण्यात आले. तरी कृपया ह्या रस्त्याचा/क्रॉसिंगचा वापर करणाऱ्या नागरीकांनी ह्याची नोंद घ्यावी.**

जाहीर सूचना

माझे अशील **श्रीमती उषा मणी श्रीधरन अय्यर** यांच्या सूचनेनुसार याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, त्यांचे वडील दिवंगत श्री. कृष्णा अय्यर सुब्रमनियम, हे त्यांच्या हयातीमध्ये सदनिका क्र. १०, "शोबा" इमारत, दि मारुती सीएचएस लि., प्लॉट क्र. ८५, पेस्तोम सागर, रस्ता क्र. १, चेंबूर, मुंबई ४०० ०८९ चे मालक होते आणि डिस्टिंक्टीव्ह क्र. ५४१ ते ६०० धारण केलेल्या ६० समभागांकरिताचे भाग प्रमाणपत्र क्र. ०१० त्यांच्या नावे धारणकर्ते होते. सदर दिवंगत श्री. कृष्णा अय्यर सुब्रमनियम दि. २३.०४.२०२० रोजी मरण पावले. त्यांच्या मृत्यूपश्चात, त्यांच्या सर्व उर्वरित कायदेशीर वारसांनी सदर समभाग माझ्या अशिलाच्या नावे हस्तांतरित करण्यास आणि तिला सदर संस्थेची सदस्य बनण्याकरिता त्यांची परवानगी आणि ना हरकत दिली आहे.

उपरोल्लेखित सदनिका किंवा तिच्या समभागांवर किंवा कोणत्याही भागावर कोणत्याही प्रकारच्या दाव्यांच्या मार्गे कोणताही स्वरुपाचा दावा असणाऱ्या सर्व किंवा कोणत्याही वारस/व्यक्ती/नॉमिनीज/अधिकाऱ्यांनी त्याबाबत मला माझ्या निम्नउल्लेखित कार्यालयात सदर जाहीर सूचना प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह लेखी सूचित करावे, अन्यथा असे मानले जाईल की, कोणत्याही व्यक्ती/वारस/नॉमिनीकडून कोणताही दावा किंवा आक्षेप नाही आणि संस्था सदर समभाग माझ्या उपरोल्लेखित अशिलाच्या नावे हस्तांतरित करण्यास मुक्त असेल. सदर १५ दिवसांच्या कालावधीनंतर कोणतेही दावे प्राप्त झाल्यास, ते सोडून दिले, गुंडाळून ठेवले, त्याग केले किंवा समर्पित केले असे समजण्यात येईल.

सही/-
अभिषेक के. पारेख
वकील उच्च न्यायालय
दुकान क्र. १५ आणि १६, जनता मार्केट,
चेंबूर रेल्वे स्थानकाजवळ,
चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.

काँग्रेसच्या माजी नगराध्यक्षासह ५ नगरसेवकांचा राष्ट्रवादीत प्रवेश

मुंबई- सत्तेत सोबत असलेल्या काँग्रेसला राष्ट्रवादीने जोरदार धक्का दिला आहे. औरंगाबादेतील गंगापूर येथील काँग्रेसच्या एका माजी नगराध्यक्ष संजय जाधवांसह ५ नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला. सोबतच अनेक कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादीचे घड्याळ हातावर बांधले. यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की, आ. सतीश चव्हाणांनी गंगापूरचे माजी नगराध्यक्ष संजय जाधवांच्या प्रवेशाबाबत मला निरोप दिला होता. तेव्हा जाधव यांच्या पक्षप्रवेशावेळी मी हजर राहीन असा शब्द दिला होता. त्यानुसार आज मी तुमच्यासमोर उपस्थित आहे. संजय जाधव यांच्यावर आता औरंगाबादमधील राष्ट्रवादीचे संघटन वाढवण्याची मोठी जबाबदारी आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गंगापूर-खुलताबादचा विकास होईल, अशी अपेक्षा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रवादीला प्रथम स्थानावर आणायचे आहे. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही अजित पवारांनी यावेळी केले. तसेच यावेळी बोलताना अजित पवार यांनी औरंगाबाद ही मराठवाड्याची राजधानी आहे. येथील विधानसभेच्या ९ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही आमदार निवडून आला नाही. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातून राष्ट्रवादीचा आमदार निवडून येतो, पण विधानसभेला एकदी आमदार निवडून येत नाही, ही विचार करण्यासारखी गोष्टी आहे.

ताडदेव आग दुर्घटनेतील रहिवासी आणखी दोन महिने बेघर राहणार

मुंबई

ताडदेव परिसरातील भाटीया रुग्णालयासमोरील २० मजली असलेल्या कमला इमारतीच्या १८ व्या मजल्यावर भीषण आगीची घटना गेल्या महिन्यात २२ जानेवारी घडली होती. या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला होता तर २० जण जखमी झाले होते. यावेळी या आगीत इमारतीची संपूर्ण वीज यंत्रणा वितळून नष्ट झाली होती.त्यामुळे येथील सर्व रहिवाशी बेघर झाले आहेत. त्यांना आणखी दोन महिने तरी घराबाहेर इतर नातेवाईक किंवा भाड्याने खोली घेऊन राहावे लागणार आहे.

वीज वाहिन्या बसविण्यास विलंब लागण्याची शक्यता

आगीमुळे जळून खाक झालेली वीज यंत्रणा पुन्हा नव्याने उभारण्यासाठी आणखी दोन महिने तरी लागणार आहेत.

तसेच या इमारतीतील वीज वाहिन्यांचे काम करण्यासाठी भरमसाठ खर्चही येणार आहे. त्यातच सध्या या इमारतीमध्ये सोसायटी स्थापन केलेली असल्यामुळे या इमारतीचा बिल्डर या प्रकरणात लक्ष घालण्यास बांधील नसल्याचे सांगत आहे.तसेच या सोसायटीचे काही पदाधिकारी अद्याप रुग्णालयात गंभीर अवस्थेत उपचार घेत आहेत. त्यामुळे रहिवाशीच त्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत. वीज जोडणी पूर्ण होत नाही तोपर्यंत या रहीवाशांना या इमार्तीतीत राहण्यास जाता येणार नाही. हे रहिवाशी १५ दिवसांपासून बाहेर आश्रयाला आहेत. त्यांना आता आणखी काही महिने बाहेरच राहावे लागणार आहे,अशी शक्यता पालिकेचे सहाय्यक आयुक्त प्रशांत गायकवाड व्यक्त केली आहे. दरम्यान, या इमारत आग दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी पालिका आयुक्त डॉ. इक्बाल चहल यांनी परिमंडल दोन चे उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे.

उल्हासनगर पालिका मुख्यालयातील पडिक जागेत साकारला बगीचा

उल्हासनगर, प्रतिनिधी - पालिकेच्या आवारातच असलेल्या पडिक जागेत विद्युत विभागाच्या संकल्पनेतून किंबहूना किमयेतून बगीचा साकारण्यात आला आहे. एकेकाळी ओस दिसणाऱ्या या जागेवरील हरित ऊर्जा प्रकल्पाच्या हिरवाईने पालिका अधिकार्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. उल्हासनगर पालिकेच्या तळमजल्यावर असलेल्या विद्युत विभागाच्या कार्यालयाच्या मागेच जवळपास ४ हजार स्क्वेअर फुटाची ओसाड जागा. जंगली झाडे झुडपांनी जागेचे विद्रुपीकरण झालेले. अशावेळी देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता हनुमंत खरात यांच्या संकल्पनेतून या ओसाड आणि ओबडधोबड जागेचे हिरवाईत रूपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला. अभियंता हनुमंत खरात, उपअभियंता महेंद्र दिंडे आणि तब्बल ५० कर्मचार्यांनी जंगली झाडेझुडपे काढून टाकली. माती उकरून काढून शोभिवंत आणि फुलांची झाडे लावली.

मुरबाड पं. स. सभापतीपदी स्वरा चौधरी

मुरबाड, प्रतिनिधी- मुरबाड पंचायत समितीच्या दिपक पवार यांनी सभापती पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त सभापती पदासाठी आज निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजपच्या स्वरा चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्या पंचायत समितीच्या या पंचवार्षिक काळातील सहाव्या सभापती ठरल्या आहेत. तालुक्याचा कारभार पाहणाऱ्या पंचायत समितीमध्ये पहिल्यांदाच पंचवार्षिक काळात पाच सभापती होऊन सहावा सभापती निवडण्याची वेळ आली होती.

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नौपाडा-कोपरी प्रभाग समितीच्या सार्व. बांधकाम विभागामार्फत ''मागासवर्गीय निधी '' लेखाशिर्षका अंतर्गत प्र.क्र.२१ (ड) मधील प्रशांत नगर वडारवाडी येथील मैदनालगत सुशोभिकरण करणे तसेच शेड उभारणे या कामाकरिता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्व. उपक्रम, स्थानिक संस्था महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि.११.०२.२०२२ ते दि.२५.०२.२०२२ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.२५.०२.२०२२ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.०२.०३.२०२२ रोजी स.११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-नौ- को/१६७०/२१-२२ सही/-
दि:१०.०२.२०२२ कार्यकारी अभियंता
plsvisitourofficialweb-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !

पोलीस महासंचालकांच्या मुदत वाढीचा फैसला २१ फेब्रुवारीला

मुंबई

राज्याचे पोलीस महासंचालक संजय पांडे यांना मुदतवाढ देवू नये अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाली असून, त्यावर २१ फेब्रुवारीला न्यायालय निकाल देणार आहे. त्यामुळे संजय पांडे यांना मुदतवाढ मिळते की नाही हे आता २१ फेब्रुवारी रोजी कळेल.

राज्याला पूर्णवेळ पोलीस महासंचालक द्यावा तसेच सध्याचे प्रभारी पोलीस महासंचालक यांना मुदतवाढ देऊ नये अशी मागणी करणारी एक जनहित याचिका ऍडव्होकेट दत्ता माने यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती त्यावर न्यायमूर्ती दीपंकर दत्ता व न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली गुरुवारच्या सुनावणीत संजय पांडे यांना सरकारने झुकते माप दिल्याबद्दल न्यायालयाने सरकारच्या भूमिकेवर कडक ताशेरे ओढले होते. न्यायालयाने म्हटले होते कि जर नियमबाह्य पद्धतीने वाढीव मुल्यांकन देत राज्य सरकारने या अधिकार्याला पदावर बसवले असेल तर तो अधिकारी कायम त्या दडपणाखालीच असेल मग अशा परिस्थितीत त्याच्यात केवळ देवाणघेवाणीचे नाते उरते. जर पांडे यांचायावार अन्याय झाला असे त्यांना वाटत होते तर मग त्यांनी न्यायालयात का नाही मागितला असा सवाल न्यायालयाने कालच्या सुनावणीत केला. १ नोव्हेंबर २०२१ ला युपीएससी निवड समितीची बैठक् पार पडल्याच्या एक आठवडा नंतर ८ नोव्हेंबर रोजी पांडेचा ग्रेड ५.६वरुन ८ करण्यात आला खूप चांगला करण्यात आल्याचा युक्तिवाद याचिका कर्त्याच्या वतीने ॲड. अभिनव चंद्रचूड यांनी केला होता.

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील **श्री. विवेकानंद जी. दुबे,** दुकान क्र. ०७, सिस्ट्रल अपार्ट., सर्व्हे क्र. १२४, हिस्सा क्र. ३, तुळिंज, नालासोपारा (पूर्व), ता.-वसई, जि. पालघर ही मालमत्ता मालक श्री. सुभाष व्ही. जैन यांच्याकडून संपादित करण्यास इच्छुक आहेत, तर मालक यांनी त्यांचे मूळ नोंदणीकरण करारपत्र क्र. **३७९७/२००९** हरवले असून, ते सापडत नाही, आणि मालक यांनी पोलीस प्राधिकाऱ्याकडे ऑनलाईन एन.सी. दाखल केली आहे आणि दुकानाच्या जागेसंदर्भात करारपत्राची प्रमाणित प्रत देखील प्राप्त केली आहे.

दुकान क्र. ०७ चा विक्री, कर्ज, इतर कोणतेही लिखित/करारपत्र किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, कोणताही हक्क, शीर्षक असणाऱ्या सर्व व्यक्ती/संस्थांना याद्वारे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कळविण्याचे सांगण्यात येत आहे, असे न केल्यास असा कोणताही आरोप हक्क, शीर्षक, लाभ, जर असल्यास मानला जाईल आणि असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे मानले जाईल आणि तो माझ्या अशिलावर बंधनकारक नसेल आणि माझे अशील ताबडतोब दुकान जागेचा नियोजित व्यवहार पूर्ण करतील.

सही/-
पी. पी. चतुर्वेदी
वकील उच्च न्यायालय
दुकान क्र. ०७, कमलाकर पाटील कंपाउंड,
गौराईनाका, नालासोपारा (पू), पालघर ४०१२०९.
मोबाईल क्र. ९३५६१७२१६९

नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता विभाग

निविदा सुचना क्रमांक - नमुंमपा/श.अ/ 308 /2021-2022

कामाचे नाव :- बेलापूर विभागातील बेलापूर गाव येथे मार्केट बांधणे..

अंदाजपत्रकिय रक्कम रु. :- 1,57,57,463/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणकप्रणालीच्या https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर व नमुंमपाच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 11/02/2022 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही /-
(संजय देसाई)
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/1322/2022

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई लिलाव विक्री सूचना
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)

सीआयएन: U45400MH2007PTC234297
नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग, चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.
लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. ०३.०३.२०२२ रोजी स. ११.०० ते दु. ०२.०० पर्यंत
(प्रत्येकी ५ मिनिटे अमर्यादित विस्तारासह)

सदर वृत्तपत्रामध्ये दि. ०८.०२.२०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तांच्या विक्रीच्या ई-लिलावाच्या जाहीर सूचनेऐवजी, मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे दि. २७.१२.२०१९ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकांद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या कटक साईट येथील मालमत्तांच्या विक्रीकरिता सदर जाहीर सूचना पारित करण्यात येत आहे. मालमत्तांची विक्री ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net द्वारे करण्यात येईल. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील, त्यांची राखीव किंमत, ईएमडी रक्कम आणि वाढीव बोली खालील तक्त्यामध्ये देण्यात आल्या आहेत:

मालमत्ता	राखीव किंमत (रु.मध्ये)	ईएमडी रक्कम (रु.मध्ये) व तिच्या सादरीकरणाची वेळ	बोलीची विस्तार रक्कम (रु.मध्ये)
मे. श्री सिमेन्ट लि., गावः चंद्रबल्ली श्यामपूर, खुंटुनी, अथागढ, जिल्हा कटक, ओडिशा-७५४०२९ ("लिलाव साइट") येथे स्थित कॉर्पोरेट ऋणकोची मालमत्ता. मालमत्तेशी संबंधित अधिक तपशील आणि लिलावाच्या अटी आणि शर्तीकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट http://ksspetron.in/liquidation.html येथे उपलब्ध प्रक्रिया दस्तऐवज पहा.	५१,३७,०४६/-	५,१३,७०५/- दि. ०८.०२.२०२२ ते १९.०२.२०२२ दरम्यान	रु. २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त

टीपा:
१) ई-लिलावाद्वारे मालमत्तांची विक्री "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" करण्यात येईल.
२) लिलावाच्या ठिकाणी असलेल्या पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (परिसमापनामध्ये)च्या मालमत्तांसोबत संयुक्तपणे केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तांचा ई-लिलाव करण्याच्या उद्देशाने सदर जाहीर सूचना पारित करण्यात येत आहे. संभाव्य बोलीदार पीईसीएलच्या संदर्भातील जाहीर सूचना आणि प्रक्रिया कागदपत्रे त्यांच्या प्रक्रिया विशिष्ट वेबसाईट म्हणजेच http://petronengineering.com/liquidation-process/liquidation-process येथे प्राप्त करू शकतील.
३) याद्वारे असे सूचित करण्यात येते की, काही मालमत्ता वाढविल्यामुळे राखीव किंमत बदलण्यात आली आहे. त्यामुळे, प्रक्रिया कागदपत्र आवृत्ती १.० मागे घेण्यात येत आहे आणि त्याऐवजी प्रक्रिया कागदपत्र आवृत्ती २.० देण्यात येत आहे.
४) कोणत्याही अधिक माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, श्री. दिविश अहूजा यांना +९१ ८८६०५८८२०९ किंवा श्री. मनिष व्यास यांना +९१ ९६६७०९०१३५ येथे संपर्क साधावा.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता
सही/-
सीएस विनीत के. चौधरी
परिसमापक
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता:
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९
दिनांक: ११.०२.२०२२
ठिकाण: नवी दिल्ली

बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. उप मु.अ./३३४३/घकव्य/प्रकल्प दिनांक ०८.०३.२०२२

उप मुख्य अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) प्रकल्प

१ला, २रा, ३रा आणि ४था मजला, बाई पद्माबाई ठक्कर मार्ग, कोतवाडी,
माहिम (शिवाजी पार्क), मुंबई - ४०००१६.

ही ई-निविदा सूचना आहे

बृहन्मुंबई महानगरपालिका (बृमुंमपा) आयुक्त खालील कामांकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका (बृमुंमपा)कडे नोंदणीकृत पात्र कंत्राटदार/संस्थांकडून शतमान दर तत्त्वावर ई-पाकिट 'अ', ई-पाकिट 'ब' आणि ई-पाकिट 'क' मध्ये ऑनलाईन ई-निविदा मागवित आहेत.

निविदा प्रत बृमुंमपाचे पोर्टल (http://portal.mcgm.gov.in) वरून डाऊनलोड करता येईल.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च रु. मध्ये	इसारा रक्कम अनामत	कालावधी	कोऱ्या ई-निविदा अर्जाची किंमत
१.	**ई-नि. क्र. ७२०००२७६९२ गोराई रीफ्यूज ट्रान्सफर स्टेशन आणि गोराई डंपिंगच्या विविध ठिकाणांवर माजलेली झाडेझुडपे हटविण्याचे काम.**	६,९८,५२०/-	७,०००/-	पंधरा (१५) दिवस	रु. ७००/- + (९% सीजीएसटी + (९% एसजीएसटी)

ई-निविदा अपलोड करण्याचा आणि ई-निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ खालीलप्रमाणे आहे : जर दिनांकांमध्ये कोणताही बदल झाल्यास बृ.मुं.म.पा. पोर्टल (http://portal.mcgm.gov.in) वर प्रदर्शित करण्यात येईल किंवा उ.मु.अ. (घ.क.व्य.) प्रकल्प यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

ई-निविदा पारित आणि विक्री होण्याचा दिनांक	**दि. १०.०२.२०२२ रोजी ११.०० वाजल्यापासून**
ई-निविदा विक्रीचा अंतिम दिनांक आणि वेळ	**दि. १८.०२.२०२२ रोजी १५.५९ वाजेपर्यंत**
पाकीट 'अ', 'ब' आणि पाकिट 'क' (ऑनलाईन) आणि बोली सुरक्षा अनामत/ ईएमडी पावती सादरीकरण	**दि. १८.०२.२०२२ रोजी १६.०० वाजेपर्यंत**
पाकीट 'अ' उघडणे	**दि. २१.०२.२०२२ रोजी १६.०० वाजल्यानंतर**
पाकीट 'ब' उघडणे	**दि. २१.०२.२०२२ रोजी १६.०५ वाजल्यानंतर**
पाकीट 'क' उघडणे	**दि. २८.०२.२०२२ रोजी १५.०० वाजता**

ई-पाकीट 'अ'; ई-पाकीट 'ब' आणि ई-पाकीट 'क' सादरीकरणाच्या अंतिम दिनांक आणि वेळेपूर्वी ऑनलाईन अपलोड करावयास हवे.

कोणत्याही किंवा सर्व ई-निविदा निविदाकारास कोणतेही कारण न दर्शविता फेटाळण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त राखून ठेवीत आहे.

तपशील बृमुंमपाची वेबसाईट http://portal.mcgm.gov.in वर उपलब्ध आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
(घन कचरा व्यवस्थापन)
प्रकल्प - आरटीएस

पीआरओ/२२६५/जाही./२०२१-२२

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा.

जीईई लिमिटेड

GWELD SEAL OF TRUST

सीआयएन: L99999MH1960PLC011879
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. ई-१, रस्ता क्र. ७, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे-४००६०४
ईमेल: Shares@geelimited.com **वेबसाईट:** www.geelimited.com
दूरध्वनी: (०२५२२) २८०३५८, **फॅक्स:** (०२५२२) २८११९९

दि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश

₹ लाखात (प्रती भाग उत्पन्न वगळता)

अ. क्र.	तपशील	३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता	३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या चालू कालावधीकरिता वर्षाकरिता अद्ययावत आकडे	३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या गत वर्षाकरिता सुसंगत ३ महिने
		(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)
१	कार्यातून एकूण उत्पन्न	८,६२३.४५	२२,४५८.४५	७,९६५.४३
२	कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबीं#पूर्व)	४२७ .५१	१,२१५.७४	६०२.७०
३	कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबीं#पश्चात)	४२७ .५१	१,२१५.७४	६०२.७०
४	कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबीं#पश्चात)	३२९.६०	९३७.३०	४५१.०१
५	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट)	३२९.४५	९३७.१८	४५१.१०
६	सम भाग भांडवल	५२०	५२०	४७३
७	राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार	लागू नाही		
८	प्रति भाग उत्पन्न (दर्शनी किंमत ₹ २/- प्रत्येकी) (चालू आणि बंद कार्यांकरिता)			
	मूळ:	१.२७	३.६१	१.९१
	सौम्यीकृत:	१.२७	३.६१	१.९१

टिपा:
१. सदर वित्तीय निष्कर्ष कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ सहवाचिता त्याअंतर्गत पारित संबंधित नियम अंतर्गत विहित केलेल्या आयएनडी एएस ३४ अंतरिम आर्थिक अहवालात नमूद केलेल्या मान्यता आणि मोजमाप तत्त्वांनुसार तयार केले गेले आहेत.
२. दि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिताचे निष्कर्ष हे कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे सूचित भारतीय लेखा मानके (आयएनडी-एएस)चे अनुपालन करतात.
३. आयएनडी एएस १०८ नुसार, कंपनीचा एकमेव अहवालयोग्य विभाग म्हणजेच "वेल्डींग कन्स्यूमेबल्स, तांब्याचे लेपन असलेल्या वायर्स, फ्लक्स कोअर्ड वायर्स आणि वेल्डींग फ्लक्सेस" आहे.
४. वित्तीय वर्ष २०२०-२०२१ आणि भागशः वित्तीय वर्ष २०२१-२०२२ मध्ये कोविड-१९ महामारीचा उद्रेक आणि त्यामुळे लागू करण्यात आलेली टाळेबंदी याचा कंपनीच्या नियमित कामकाजावर परिणाम झाला. त्यानुसार, कंपनीने मालमत्ता, प्लान्ट आणि उपकरणे, गुंतवणूक, यादी, प्राप्तीयोग्य वस्तू आणि अन्य विद्यमान मालमत्तांच्या मूळ किंमतीवर महामारीमुळे होणाऱ्या संभाव्य प्रभावांचा विचार केला आहे. या साथीच्या आजारामुळे जागतिक आर्थिक परिस्थितीमध्ये होऊ शकणाऱ्या संभाव्य भावी अनिश्चिततेसंबंधित धारणांचा विचार करताना कंपनीने या वित्तीय निकालांच्या मंजुरीच्या समयी अंतर्गत आणि बाह्य माहिती वापरली आहे जी कंपनीची भविष्यातील अपेक्षित कामगिरी निश्चित करण्यासाठी संबंधित आहे. कंपनीने आपल्या तरलतेच्या स्थिती, अशा मालमत्तांची पुनर्प्राप्तीचे मूल्यांकन केले आहे आणि सध्याच्या अंदाजानुसार या मालमत्तेची मूळ रक्कम परत मिळण्याची अपेक्षा आहे. कोविड-१९ चा कंपनीच्या वित्तीय निष्कर्षावरील परिणाम हा या वित्तीय निष्कर्षांच्या मंजुरीच्या तारखेस नोंदविलेल्या अंदाजापेक्षा वेगळा असू शकतो.
५. गत वर्ष/कालावधीचे आकडे आवश्यक तेव्हा पुनर्गठित किंवा पुनर्वर्गिकृतकेले आहेत.
६. सदर निष्कर्ष कंपनीच्या वेबसाईट **www.geelimited.com** आणि बीएसई लिमिटेडच्या वेबसाईटवर अपलोड केले जातील आणि पाहण्याकरिता उपलब्ध असतील.

जीईई लिमिटेड करिता
सही/-
पायल अगरवाल
पूर्ण-वेळ संचालक आणि सीएफओ

दिनांक: १० फेब्रुवारी , २०२२
ठिकाण: ठाणे

रामेश्वर मिडिया